# नवराष्ट्र

नवभारत पत्रसमूहाचे मराठी वृत्तपत्र

सदैव आपल्या वाचकांसोबत

e-paper : navarashtra.com

❖ मुंबई, मंगळवार, १ ऑगस्ट २०१७, श्रावण शुक्ल ९, पाने : १२+४ मूल्य : रु. ४.०० ❖


## नवजात मुलीवर यशस्वी उपचार

**नवी मुंबई :** एका नवजात मुलीवर मुंबईतील लिलावती रुग्णालयात यशस्वी उपचार करण्यात डॉक्टरांना यश आले आहे. वाशी येथील रुग्णालयात सीमा शिव जगत यांना चिमुकली मुलगी झाली. जन्मावेळी तिला श्वासोच्छवासाच त्रास होत होता. त्यामुळे या नवजात मुलीला नवजात अर्भक अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले होते. येथे अत्यावश्यक सेवा नव्हती. त्यामुळे तिला लिलावती रग्णालयात दाखल करण्यात आले. मुलीवर तातडीने उपचार सुरु झाले. लहान आतडे, मोठ्या आतड्यांचा काही भाग आणि प्लीहा छातीच्या पोकळीत स्थलांतरीत झाल्यामुळे श्वसनाचा त्रास होत होते. यावर जटील शस्त्रक्रिया करुन यशस्वी उपचार करण्यात आले.

Scanned by CamScanner